# Quadrant II-Notes

**Programme : B.Sc.B.Ed. / B.A.B.Ed.**

**Subject : Education**

**Paper Code : BSBAEDUM 07&08.**

**Paper Title : Methodology cum Content of Marathi**

**Unit : घटक१: भाषा अध्यापनात नियोजनाचे महत्व**

**Module Name: नियोजनाचे महत्व**

**Name of the Presenter: Mr.Sagar Machindra Davari.**

---

**नियोजन संकल्पना:**

**नियोजन व्याख्या-**

१.एखादे कार्य करण्यापूर्वी ते कसे करावयाचे याचा आराखडा अगोदर ठरवण्याच्या प्रक्रियेला 'नियोजन'असे म्हणतात.

२.थिओ हैमन यांच्या मते,पुढे करावयाच्या कामासंबंधी आधी रूपरेषा ठरवण्याची क्रिया म्हणजे नियोजन होय.

***उदाहरणार्थ,***

***"बक्षीस वितरण कार्यक्रम नियोजन"***

शाळेतील बक्षीस वितरण कार्यक्रम करत असताना आपण आधी त्या कार्यक्रमाचे नियोजन करतो म्हणजेच त्या कार्यक्रमासाठी कोणते साहित्य लागेल,मनुष्यबळ किती लागेल,पैसे किती लागतील, कोणकोणती कामे करावी लागतील, कोणा कोणाला निमंत्रण द्यावे लागेल, कोणा कोणाला कोणती कामे विभागून द्यावी लागतील तसेच शाळेच्या वेळापत्रकात कोणते बदल करावे लागतील अशा कितीतरी बाबींविषयी आपण कार्यक्रमापूर्वी चर्चा करतो आणि कार्यक्रम कसा असेल याचा संभाव्य आराखडा तयार करतो. यालाच आपण त्या कार्यक्रमाचे नियोजन म्हणतो.

**नियोजन प्रक्रिया:**

- **हेतू** – कार्यक्रम हेतू निश्चिती
- ***विश्लेषण*** - उपलब्ध साहित्याचा आढावा,मानुष्यबळाचा आढावा
- ***आराखडा*** – संभाव्य आराखडा तयार करणे.
- ***कार्यक्रमाची अंमलबजावणी-*** आरखड्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाही करणे.
- ***मूल्यमापन*** – कार्यक्रमानंतर आढावा घेवून यश अपयशाची चर्चा करून पुढील नियोजनासाठी सुधारणा

**नियोजनाचे फायदे:**

1. नियोजनामुळे कार्यात शिस्तबद्धता व क्रमबद्धता निर्माण होते.
2. कामाच्या जबाबदाऱ्या निश्चित करता येतात.
3. उपलब्ध साधनांची वाटणी योग्य करता येते.
4. संभाव्य अडचणी दूर करता येतात.
5. अपेक्षित ध्येय साध्य करणे सोपे जाते.
6. नियोजनामुळे वेळ,पैसा व श्रम यांची बचत करता येते.

**शालेय नियोजनाची उद्दिष्टे-**

शालेय स्तरावर शालेय नियोजन केले जाते,आपण शालेय नियोजनाची काही उद्दिष्टे पाहू,

१.शाळेतील मानवी व अमानवी घटकांचा पुरेपूर उपयोग करून घेणे

२.शालेय व्यवस्थापन सुरळीत व सुव्यवस्थित चालवणे.

३.वर्षभरातील शैक्षणिक कार्य अपेक्षित वेळेत साध्य करून घेणे.

४.सहशालेय कार्यक्रम योग्य पद्धतीने चालविणे.

५.वर्षभराच्या कार्याचे मूल्यमापन करणे.

**शालेय नियोजनाचे महत्व -**

- विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो.
- शैक्षणिक व्यवस्थापन सुव्यवस्थित होण्यास मदत होते.
- शिक्षण प्रक्रियेतील अपेक्षित ध्येय धोरणे साध्य होण्यास मदत होते.
- प्रत्येकाच्या कामाची योग्य विभागणी व त्यानुसार कार्य करण्याची माहिती मिळते.
- दैनंदिन कार्य शिस्तबद्ध आणि क्रमबद्ध होते.

References/ संदर्भ-


पांढरे,ग.वि.व पठाण इ.उ.-गुरूकिल्ली औरंगाबाद,शास्त्र प्रकाशन,२०११.

कुंडले,म. बा. अध्यापन शास्त्र आणि पद्धती,व्हीनस प्रकाशन,पुणे,२००८.

दुणाखे अरविन्द,शिक्षक प्रशिक्षण,नित्य नूतन प्रकाशन,पुणे,२००९.